**दि.०६/०२/२०२० रोजी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकासाठी सदर क्षेत्रातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी दोन तासांची सवलत देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक: मतदान २०२०/प्र.क्र.१४/कामगार-९**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २८ जानेवारी, २०२०

<u>**संदर्भ**</u> :- राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे क्रमांक रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१४/का.६, दि.२३ जानेवारी, २०२० रोजीचे पत्र.

**शासन परिपत्रक-**

राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे दि.०६ फेब्रुवारी, २०२० रोजी सोबतच्या <u>**परिशिष्ट-१ व २**</u> मध्ये नमूद केल्याप्रमाणे निवडणूक घेतली जाणार आहे. सदर निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा यासाठी खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

I) निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/अधिकारी/कर्मचारी यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी **कमीत कमी दोन तासांची सवलत** देण्यात यावी.

II) सदर सवलत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू राहिल. (उदा.खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाटयगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.)

III) वर नमूद केल्यानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी/व्यवस्थापनाने वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. या आदेशांचे पालन न केल्यास संबंधित आस्थापनांविरुध्द आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

४. सदर परिपत्रक राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे क्रमांक रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१४/का.६, दि.२३ जानेवारी, २०२० रोजीच्या पत्रास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२००१२८१५२१४३३२१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHASHANK MADHAV SATHE

Digitally signed by SHASHANK MADHAV SATHE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=6b4e6443f4621997398029547f71977c2d89e32e391d622c519f39893078c30b, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=11a06bf85893554ac5cded657c0f1435af29a0ad118fb759493176e40002b178, ou=INDUSTRY ENERGY AND LABOUR , o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHASHANK MADHAV SATHE
Date: 2020.01.28 15:24:03 +05'30'

**( श. मा. साठे )**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत**- उपरोक्त परिपत्रक सर्व संबंधित आस्थापनांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

१. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई-३२

२. प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

३. कामगार आयुक्त, वांद्रे, मुंबई-५१ (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)

४. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, वांद्रे, मुंबई (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)

५. संचालक, बाष्पके, वांद्रे, मुंबई, (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)

६. प्रशासक/मुख्याधिकारी (महानंगरपालिका/नगरपंचायत/नगरपरिषद), नांदेड, जळगाव, परभणी, अहमदनगर, कोल्हापूर, धुळे, नांदेड, महाराष्ट्र राज्य.

७. जिल्हाधिकारी, नांदेड, जळगाव, परभणी, अहमदनगर, कोल्हापूर व धुळे.

८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई यांना व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

९. कामगार विभागातील सर्व कार्यासने.

**प्रत माहितीसाठी :**

१ मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव

२ मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव

३ मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

## दिनांक ०६/०२/२०२० रोजी होणाऱ्या निवडणुकांचा तपशील

### परिशिष्ट-१

### महानगरपालिका पोट निवडणूक

| अ.क्र. | जिल्हा | महानगरपालिकेचे नाव | प्रभाग/जागा क्र. |
|---|---|---|---|
| १ | नांदेड | नांदेड-वाघाळा | १३- ड |
| २ | जळगाव | जळगाव | १९-अ |
| ३ | परभणी | परभणी | १४- अ |
| ४ | अहमदनगर | अहमदनगर | ६-अ |

### परिशिष्ट-२

### नगरपरिषद/नगरपंचायती पोट निवडणूक

| अ.क्र. | जिल्हा | नगरपरिषद/ नगरपंचायतीचे नाव | प्रभाग/जागा क्र. |
|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | कुरुंदवाड | २-ब |
| २ | धुळे | दौंडाईचा-वरवाडे | ४-अ |
| ३ | नांदेड | हिमायत नगर | १३ |
| | | बिलोली | ५-अ |
| | | धर्माबाद | २-अ |
| | | | ४-अ |
| | | नायगाव | १ |

-----------------

**Regarding giving two hours off to voters to exercise their voting rights on the day of Elections.**

Government of Maharashtra
Industry, Energy and Labour Division

**Reference**: State Election Commission letter SEC /NP-2019/PK – 14/Ka.6 dt 23.1.19.

**Government Circular :**

As per orders of State Election Commission Election will be held on 06.02.2020 at the lcoations mentioned in the list given in annexure. Below orders are issued so as to facilitate voting rights of voters in these constituency:

I) Workers / officers / employees who are eligible voters in the electoral polling area should be given a minimum 2 hours off to exercise their voting rights.

II) Above will be applicable to all the establishments, factories, shops, etc. coming under the Industry, Energy and Labor Department (for example, establishment of private companies, all shops and other establishments, residential hotels, eating houses, other houses, theaters , businesses, industrial activities or other establishments as well as Information and technology companies, shopping centers, malls, retailers, etc.).

III) As mentioned above, owners of the all establishments/ managements who comes under industries, energy and labour department should take precautions carefully & ensure to follow the above instructions properly. If there is a complaint about voters not getting the right holiday or concession for voting, appropriate action will be taken against them.

4) Said circular is published as per State Election Commission letter SEC /NP-2019/PK – 14/Ka.6 dt 23.1.19.

By order and by the order of the Governor of Maharashtra.

**Digitally signed by Dr. Shrikant L Pulkundwar**

**Annexure**

Details of the Election events on 06/02/2020

Municipal Corp By-election

| Sr. No. | District | Name of Municipal Corporation | Prabhag/Ward No. |
|---|---|---|---|
| 1 | Nanded | Nanded-Waghola | 13-D |
| 2 | Jalgaon | Jalgaon | 19-A |
| 3 | Parbhani | Parbhani | 14-A |
| 4 | Ahmednagar | Ahmednagar | 6-A |

Nagarparishad / Nagar panchayat By-election

| Sr. No. | District | Name of N. parishad / N Panchayat | Prabhag No./Ward No |
|---|---|---|---|
| 1 | Kolhapur | Kurundwad | 2-B |
| 2 | Dhule | Daundaicha-Varvade | 4-A |
| 3 | Nanded | Himayat Nagar | 13 |
| 4 | Nanded | Biloli | 5-A |
| 5 | Nanded | Dharmabad | 2-A & 4-A |
| 6 | Nanded | Naygaon | 1 |